पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.महिला व बालकल्याण समिती

**कार्यपत्रिका क्रमांक ४**

**सभावृत्तांत**

दिनांक २४/०७/२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२४/०७/२०१३** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. लोंढे शुभांगी संतोष - सभापती**
२) मा. तापकीर अनिता मच्छिंद्र
३) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
४) मा. नेटके सुमन राजेंद्र
५) मा. गोफणे अनुराधा देविदास
६) मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
७) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.कुलकर्णी – सहा.आयुक्त, मा.मोरे – मुख्य लिपिक, मा.जगताप – समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>

विषय क्र. १) पिंपरी चिंचवडच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये म.ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे अर्धपुतळे मनपातर्फे खरेदी करुन देणेबाबत - मा. प्रतिभा भालेराव, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. २) मनपाच्या शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरु करणेबाबत - मा. प्रतिभा भालेराव, मा. शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३) मराठी शाळेत मुलांना खेळणी देणेबाबत - मा. प्रतिभा भालेराव, मा. अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ४) तीन वर्ष पूर्ण झालेल्या महिला बचत गटास व्यवस्थापन व बळकटी करणासाठी अर्थसहाय्य देणबाबत - मा. सुमन नेटके, मा. प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक १०/०७/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( **कार्यपत्रिका क्र.३** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले</u> -

ठराव क्रमांक – ६ विषय क्रमांक – १
दिनांक – २४/०७/२०१३
सुचक – मा.प्रतिभा भालेराव अनुमोदक – मा.शकुंतला बनसोडे
संदर्भः- मा.प्रतिभा भालेराव, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवडच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे अर्धपुतळे महापालिकेतर्फे खरेदी करुन देण्यात यावेत. शिक्षणाचा व स्त्री शिक्षणाचा पाया यांनी घातला तरी त्यांची जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यासाठी पुतळे खरेदी करुन सर्व शाळांना देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७ विषय क्रमांक – २
दिनांक – २४/०७/२०१३
सुचक – मा.प्रतिभा भालेराव अनुमोदक – मा.शकुंतला बनसोडे
संदर्भः- मा.प्रतिभा भालेराव, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव..

महापालिकेच्या मराठी शाळेचे वर्ग पट हजेरी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. शहरात अनेक प्रायव्हेट इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरु आहेत. अनेक नागरिकांचा कल इंग्रजी माध्यमाकडे आहे. तसेच पट कमी असल्यामुळे पालिकेने शिक्षक वर्ग कमी ठेवला आहे. एका शिक्षकाकडे दोन तीन वर्ग दिल्यामुळे अभ्यास निट होत नाही, टक्केवारी कमी होत चालली आहे. त्यामुळे इंग्रजी व मराठी अशा दोन्ही माध्यमांमध्ये शिक्षण सुरु करण्यास मान्यता देणेत येत आहे. त्यामुळे अनेक पालकांची प्रायव्हेट शाळेद्वारे होणारी आर्थिक पिळवणूक थांबवता येईल.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

- - - - - - - - - - - - - - - - -

ठराव क्रमांक – ८ विषय क्रमांक – ३

दिनांक – २४/०७/२०१३

सुचक – मा.प्रतिभा भालेराव अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भः- मा.प्रतिभा भालेराव, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव..

मराठी शाळेत येणा-या मुलांना खेळणी देणेबाबत तसेच खाऊ वाटप करणेबाबत व ज्या शाळांना ग्राऊंड आहे तिथे मुलांना खेळण्यासाठी खेळणी बसविणेबाबत ( घसरगुंडी, झोके, जंतरमंतर ) अशी खेळणी शाळेच्या ग्राऊंडवर बसविणेस मान्यता देणेत येत आहे. त्यामुळे मराठी शाळेतील मुलांची संख्या वाढेल.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९ विषय क्रमांक – ४

दिनांक – २४/०७/२०१३

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.प्रतिभा भालेराव

संदर्भः- मा.सुमन नेटके, मा.प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव..

महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत घटक योजना क्र.९ एक वर्ष पूर्ण झालेल्या बचतगटास अर्थसहाय्य या योजनेमध्ये खालीलप्रमाणे बदल करुन सन २०१३-१४ या आर्थिक वर्षापासून सदर नवीन योजनेची अंमलबजावणी करण्यास मान्यता असावी.

**योजनेचे नाव** – तीन वर्ष पूर्ण झालेल्या महिला बचत गटास व्यवस्थापन व बळकटी करणासाठी अर्थसहाय्य देणे.

**योजनेचे स्वरुप** - पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात वास्तव्य असलेल्या किमान १० ते २० महिलांनी एकत्र येऊन बचतगटाची स्थापना करुन राष्ट्रीयकृत बँक, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक इ. मध्ये बचतखाते सुरु करून तीन वर्ष कालावधी पर्यंत बचतगट कार्यरत असल्यास रक्कम रुपये १८,०००/- ( अक्षरी र.रु.अठरा हजार फक्त ) अर्थसहाय्य अदा करणेत येईल.

**कार्यक्षेत्र** – पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्र.

**अटी व शर्ती –**

१) सदर अर्थसहाय्य मिळण्याकरीता सदर बचतगट बँकेमध्ये बचतखाते सुरु केल्याच्या महिन्यापासून पुढील तीन वर्षे कार्यरत असणे आवश्यक राहिल. त्याकरिता बचतगटाचे पासबुकची अद्ययावत प्रत सादर करणे आवश्यक राहिल.

२) सदर बचतगटातील सर्व महिला सभासदाचे वास्तव्य पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत असणे आवश्यक राहिल. त्याकरीता प्रत्येक महिला सभासदाचे आधारकार्ड सादर करणे आवश्यक राहिल.

३) बचतगटाचे खाते हे राष्ट्रीयकृत बँक, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक, यामध्ये असेल त्या

बचतगटांनाच या योजनेचा लाभ देणेत येईल.

४) या निधीचा उपयोग बचतगटाचे व्यवस्थापन, बचतगटाचे बळकटीकरण करणे, बचतगटाचे अंतर्गत कर्ज व्यवहाराकरिता तसेच यशस्वीपणे कार्य करणा-या, व्यवसाय उद्योगधंदा करणा-या बचतगट संस्थाचे कामाची माहिती घेणेकामी अभ्यासदौरा आयोजित करणे इ.साठी करता येईल.

५) सदर बचतगटातील महिला इतर बचतगटास सहभागी असलेबाबत अथवा इतर महिलां बचतगटातील महिला सदर बचतगटात सभासद असल्यास अशा महिलेचे अथवा महिलांची नावे बचतगटातून कमी करुन बचतगट पुनःर्गठीत करण्यात आला असल्याबाबत बचतगटाचे ठरावाची प्रत सादर करणे आवश्यक राहिल.

६) अशा प्रकारचा निधी बचतगटास मंजूर करणे अथवा न करणे याबाबतचा अंतिम अधिकार मा.आयुक्त अथवा अतिरिक्त आयुक्त यांना राहिल.

उपरोक्त प्रमाणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**( लोंढे शुभांगी संतोष )**
**सभापती**
मा.महिला व बाल कल्याण समिति
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ६९६ /२०१३
दिनांक - २५/०७/२०१३

सही/-
**मुख्य लिपिक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.